**R.P.A.D.**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

STATE ELECTION COMMISSION MAHARASHTRA

क्रमांक- रानिआ/रापानो-२०१६/प्र.क्र.१२५/का.११
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - ३०.०३.२०२२

प्रति,
श्री. सुनील बाबुराम शुक्ला ,
अध्यक्ष, "युनायटेड कॉंग्रेस पार्टी "
२०१/२०२, दुसरा मजला, सुकुमार कॉर्नर, १२७,
जे.पी.रोड, दाऊद बाग लेन, अंधेरी (प), मुंबई ४०००५८.

विषय :- राजकीय पक्षाच्या नावातील बदलास मंजूरी देण्याबाबत.
संदर्भ:-१.आपला दि.२८/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव
२.आयोगाची रानिआ/रापनों२०१६/प्र.क्र.१२५ /का.११,
दि.१७/०२/२०२२ ची शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना

महोदय,

राजकीय पक्षाची नोंदणी आदेश,२००९ दि.३१ मार्च,२००९ भाग दोन (९) (दोन) मधील तरतुदीनुसार युनाईटेड कॉंग्रेस पार्टी या पक्षाची नोंदणी आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/रापनों-०१६/प्र.क्र.१२५/का.११.दि.२५ जानेवारी,२०१७ अन्वये करण्यात आली होती. आपण पत्र दि.२८जानेवारी,२०२२ अन्वये युनाईटेड कॉंग्रेस पार्टी या पक्षाच्या नावात बदल करून त्या ऐवजी पक्षाचे नाव उत्तर भारतीय विकास सेना असे बदलून त्याची नोंदणी आयोगाकडे करण्याबाबत विनंती केली आहे.

याअनुषंगाने पक्षाच्या नावात बदल करण्याबाबत राजकीय पक्ष नोंदणी आदेश,२००९ दि.३१ मार्च,२००९ व दि.१५ फेब्रुवारी, २०२२ च्या आदेशांनुसार उक्त संदर्भ क्र.२ अन्वये अधिसूचना दि.१७/०२/२०२२ रोजी प्रसिध्द करून पक्षाच्या नाव बदलाबाबत सर्वसाधारण जनतेकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या.तथापि विहित मुदतीत हरकती प्राप्त न झाल्याने,आयोगाच्या उक्त आदेशांतील भाग दोन ३.(१०) (अ) च्या सुधारित तरतुदीनुसार "युनाईटेड कॉंग्रेस पार्टी" या पक्षाचे नावात "उत्तर भारतीय विकास सेना" असे बदल करण्यात राज्य निवडणूक आयोगाची मान्यता देण्यात येत आहे.

आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र.

प्रत:-१.विभागीय आयुक्त, सर्व विभागीय आयुक्तालय,
२.महानगरपालिका आयुक्त, सर्व महानगरपालिका कार्यालय,
३.जिल्हाधिकारी,सर्व जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

४.मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषद कार्यालय.
५.मुख्याधिकारी,नगरपरिषदा/नगरपंचायती,सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती कार्यालय.
६.राज्य निवडणूक आयेगातील सर्व अधिकारी.
७.निवड नस्ती